Directorate of Sericulture
NAGPUR
30 AUG 2007
Desk No.
Inward No. 574

जिल्हास्तरीय योजनेंतर्गत (डीपीडीसी) विकासात्मक कामाच्या खर्चासाठी सुधारीत खर्चाची मानके निश्चित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय, क्रमांक रेशीम-११०६/प्र.क्र.७३/रेशीम कक्ष,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २१ ऑगस्ट, २००७

वाचा : संचालक, रेशीम, नागपूर यांचे पत्र क्र. रे/कार्या-८/डीपीडीसी/सु.मा./०६-०७/२७२, दिनांक ९.१.२००७

**प्रस्तावना :-**

रेशीम उद्योग हा कृषीवर आधारीत असलेला व रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला कुटीर उद्योग आहे. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती व हवामान रेशीम उद्योगास अत्यंत अनुकूल आहे. राज्यात तुती व टसर रेशीम उद्योग या योजना राबविण्यात येतात. रेशीम संचालनालयामार्फत राज्यात रेशीम उद्योगाचा विस्तार व विकास कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमामध्ये तुती लागवड करण्यासाठी नवीन शेतकरी लाभार्थींची निवड केली जाते. राज्यातील आणि परराज्यातून तुती कलमे खरेदी करुन वाहतुकीने पुरवठा केली जातात आणि तांत्रिक मार्गदर्शन देऊन लागवड केली जाते. नवीन लाभार्थींना रेशीम उद्योगाचे परिपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते. नवीन तुती लागवड केलेल्या शेतकऱ्यांना राज्याबाहेर अथवा राज्यांतर्गत अभ्यासदौरा आयोजित केला जातो. तुती लागवड केलेल्या लाभार्थींना आवश्यकतेनुसार निरोगी अंडीपुंजाचा पुरवठा इत्यादी कामे केली जातात. सदरहू कार्यक्रमास येणारा खर्च संबंधित जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय योजनेत तरतूद उपलब्ध करुन करण्यात येतो.

२. रेशीम संचालनालय स्थापनेपूर्वी रेशीम योजना महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येत होते. खादी ग्रामोद्योग मंडळास असलेल्या अधिकारांतर्गत सन १९९७ पूर्वी त्यांनी खर्चाची मानके निश्चित करुन योजना राबविली जात होती. शेतकऱ्यांकडील विकासात्मक कामकाज करण्यासाठी जिल्हास्तरीय योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेली मानके ही रेशीम संचालनालयाचे स्थापनेपासून (सन १९९७) बदलण्यात आलेली नाहीत.सध्या परिस्थितीमध्ये महागाईनुसार वस्तुंचे बाजारभाव, मजुरी दर, वाहतुकीचा वाढलेला खर्च आणि शेतकऱ्यांची तुती कलमे वाढीव दराने खरेदी करण्याची मागणी विचारात घेता, सध्याचा खर्च तरतुदीची मानके फारच अपुरी पडत आहेत. त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्यामुळे जिल्हास्तरीय (डीपीडीसी) विकासात्मक कामाच्या खर्चासाठी सुधारीत खर्चाची मानके

शासन निर्णय :

रेशीम संचालनालयाचा विस्तार व विकास होण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय योजनेंतर्गत (डीपीडीसी) विकासात्मक कामांच्या खर्चासाठी खालीलप्रमाणे सुधारीत खर्चाची मानके दिनांक १ सप्टेंबर, २००७ पासून लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | सुधारीत खर्चाची मानके |
|---|---|---|
| १ | तुती कलमे खरेदी मे.टन | अ) एम-५ तुती जातीकरिता- रु.१२००/-<br>ब) व्ही-१ एस-सेरीज करिता रु.१५००/-<br>(सध्याची माणके रु.७००/- प्रति मे.टन) |
| २ | तुती कलमे वाहतूक खर्च | जिल्हयातील - जिल्हयाबाहेरील वाहतुकीस प्राप्त झालेल्या निविदानुसार व वाहतुक अंतराप्रमाणे |
| ३ | तुती कलमे लोडींग व अनलोडींग खर्च | तुती कलमे लोडींग व अनलोडींग खर्च रु.२००/- प्रति मे.टन (पूर्वीची माणके रु.२०/- प्रति मे.टन) |
| ४ | तुती कलमे वाहतुकीचा इतर खर्च (वजन काटा, जकात खर्च) | प्रत्यक्षात पावतीप्रमाणे येणारा खर्च |
| ५ | अंडीपुंज पुरवठा (प्रति १०० अंडीपुंजास) | केंद्रीय रेशीम मंडळाच्या १०० अंडीपुंजाच्या प्रचलीत दर विचारात घेऊन किंमतीच्या ७५% व २५% प्रमाणात अनुक्रमे डी.पी.डी.सी. व शेतकरी यांचा आर्थिक सहभाग (जुने दर रु.१५०/-) |
| ६ | नवीन शेतकरी प्रशिक्षण विद्यावेतन खर्च- (१५ दिवसाचे किटक संगोपन व तुती बागेची देखभाल अभ्यासक्रम) | प्रति लाभार्थी रु.७५०/- प्रमाणे विद्यावेतन (जुने दर रु.३००/-) |
| ७ | नवीन शेतकरी प्रशिक्षणाचा इतर खर्च (घरभाडे, डेडस्टॉक, प्रवास खर्च, स्टेशनरी, उदघाटन व चहापाणी खर्च इ. | प्रति लाभार्थी प्रशिक्षण खर्च रु.२५०/- प्रमाणे (जुने दर रु.१५०/-) |
| ८ | शेतकरी अभ्यास दौरा खर्च दहा दिवस (राज्यात व राज्याबाहेरील दौरा) | प्रति लाभार्थी दैनिक भत्ता, लॉजिंग व इतर खर्चासह प्रतिदिन रु.१००/- अधिक जवळच्या मार्गाचा प्रवास खर्च (बस/रेल्वे). |

| | | |
|---|---|---|
| ९ | रेशीम उद्योग प्रचार व प्रसिध्दी खर्च, तुती लागवड उद्दीष्टानुसार वर्षात मेळावे (अंदाजे ५०० शेतकरी) | रु.५०,०००/- |
| १० | तुती रोप खरेदी खर्च प्रति नग रु.१/-, सांडीपी योजनेचा लाभ विचारात घेवून | प्रति लाभार्थी १० गुंठे क्षेत्रासाठी २७०० रोपे पुरवठा विचारात घेऊन प्रति रोप रु.०.५० प्रमाणे अनुदान खर्च. |

२. वरील योजना राबविण्यासाठी होणारा खर्च रेशीम संचालनालयाकडे सन २००७-२००८ मध्ये जिल्हास्तरीय योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. यासाठी होणारा खर्च सन २००७-२००८ साठी मंजूर तरतूदीच्या मर्यादेतच करण्यात यावा. या आर्थिक वर्षात या शिर्षाखाली अतिरिक्त तरतूद उपलब्ध केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच यापुढील आर्थिक वर्षात लागणारी तरतूद प्रत्येक वर्षी विहीत मार्गाने अर्थसंकल्पीत करुन घेण्यात यावी. सदरचा खर्च करण्यास तसेच त्यांच्या अखत्यारितील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वितरीत करण्यास "नियंत्रक अधिकारी" म्हणून संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना घोषित करण्यात येत आहे.

३. सन २००६-२००७ मध्ये करण्यात आलेल्या खर्चास विहीत पध्दतीने कार्योत्तर मंजूरी घेण्यात यावी. सुधारीत मानके दिनांक १.९.२००७ पासून लागू करण्यात येतील. पूर्वलक्षी प्रभावाने ते लागू करण्यात येऊ नयेत, याची नोंद घ्यावी.

४. सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४५७/२००७/व्यय-२, दिनांक १४.८.२००७ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०८२११६१३५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(प्र. म. दुधलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

D:\Est-1\RESHIMGR\31

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ ऑडीट), मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता / ऑडीट), नागपूर
३. वरीष्ठ उप महालेखापाल (पडताळणी), बाहय लेखापरिक्षा विभाग (नागरी), मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६. सर्व जिल्हयांचे जिल्हाधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी
७. नियोजन विभाग (का-१४६३), मंत्रालय, मुंबई(दोन प्रती)
८. वित्त विभाग (व्यय-२/ अर्थसंकल्प कार्यासन-३ व१२/ कोषागारे/वित्तीय सुधारणा), मंत्रालय,मुंबई
९. संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, द्वारा महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. उमरेड रोड, नागपूर-९
१०. सहाय्यक संचालक, रेशीम संचालनालय, द्वारा महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. उमरेड रोड, नागपूर-९
११. सहाय्यक संचालक, विभागीय रेशीम उद्योग कार्यालय, विलास कॉलनी, व्ही.एम.व्ही रोड, अमरावती
१२. सहाय्यक संचालक, विभागीय रेशीम उद्योग कार्यालय, २४ ब, मुंबई पुणे मार्ग, पुणे-३
१३. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), उपविभागीय रेशीम उद्योग कार्यालय, बजाज बिल्डींग शास्त्री चौक, गोवर्धन मार्ग, वर्धा.
१४. रेशीम विकास अधिकारी, (श्रेणी १), उपविभागीय रेशीम उद्योग कार्यालय, सिडको, एन-१ प्लॉट नंबर १५, एम.आय.डी.सी, टाऊन सेंटर जवळ, नवीन औरंगाबाद
१५. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), उपविभागीय रेशीम उद्योग कार्यालय, व्यापारी पेठ, शाहुपूरी, पहिली गल्ली, कोल्हापूर.
१६. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), उपविभागीय रेशीम उद्योग कार्यालय, इंदीरा स्टेडीयम, गाळा क्रमांक ५०, सोलापूर.
१७. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), जिल्हा रेशीम कार्यालय, प्लॉट नंबर १४, का/१ श्रीसिध्दी विनायक कॉलनी ऑक्झीलियम हायस्कूल, नगर मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर - ४१४००१
१८. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), प्रादेशिक टसर रेशीम कार्यालय, आरमोरी, जिल्हा-गडचिरोली
१९. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), उपविभागीय रेशीम उद्योग कार्यालय, वसमत मार्ग, [illegible] नाक्याजवळ, परभणी -१
२०. रेशीम विकास अधिकारी (श्रेणी १), रेशीम उद्योग कार्यालय, भोंडे हॉस्पीटल जवळ, धार

D:\Est-I\RESHIMGR\32